मौजे येडेनिपाणी ता.वाळवा जि.सांगली येथील कै.स्वातंत्र सैनिक पांडु मास्तर उर्फ पांडुरंग गोंविद पाटील यांचे स्मारकाच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक: स्मारक-२०१६/प्र.क्र.२००/योजना-११

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ

फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दिनांक: १९ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा :</u>

1) **शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६.**
2) **शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः स्मारक-२०१६/प्र.क्र.७२/पंरा-९, दिनांक ०२ डिसेंबर, २०१६.**
3) **शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः स्मारक-२०१६/प्र.क्र.२००/पंरा-९, दिनांक ११ जानेवारी, २०१७.**

प्रस्तावना:

जिल्हाधिकारी यांनी दिनांक १२.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मौजे येडेनिपानी ता. वाळवा जि. सांगली येथे कै.स्वातंत्र्य सैनिक पांडू मास्तर उर्फ पांडूरंग गोविंद पाटील यांचे स्मारक बांधण्यासाठी रू.२,२५,४३,०००/- (अक्षरी रूपये दोन कोटी पंचवीस लक्ष त्रेचाळीस हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षेतेखालील शिखर समितीने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने, उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयात यंत्रणा जिल्हा परिषद, सांगली दर्शविण्यात आली आहे. तथापि जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणा असावी, असा निर्णय घेतला असुन तद्नुषंगाने स्मारकाची कामेही प्रगती सुरु केली आहे. सबब विचारांती सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणेस कार्योत्तर मंजूरी देऊन सदर स्मारकाच्या बांधकामासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मौजे येडेनिपानी ता. वाळवा जि. सांगली येथे कै.स्वातंत्र्य सैनिक पांडू मास्तर उर्फ पांडूरंग गोविंद पाटील यांचे स्मारकाच्या उभारण्यासाठी रू.२,२५,४३,०००/- (अक्षरी रूपये दोन कोटी पंचवीस लक्ष त्रेचाळीस हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या बांधकाम आराखडयास दिनांक ११ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. त्यानुषंगाने कै.स्वातंत्र्य सैनिक पांडू मास्तर उर्फ पांडूरंग गोविंद पाटील यांचे स्मारकाचे बांधकाम सुरु करण्यासाठी रुपये रू.१,००,००,०००/- (अक्षरी रूपये एक कोटी फक्त) इतका प्राथमिक

कामाच्या देयकांकरिता निधी वितरीत करण्यात येत आहे. सदर स्मारकाच्या बांधकामाच्या पुर्ततेनुसार उर्वरित निधीची मागणी संबंधित यंत्रणेने करावी.

३. उपरोक्त निधीतून खर्च करण्याकरिता सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, सांगली (सांकेतांक क्रमांक २४०१००१०३९) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व जिल्हाधिकारी, सांगली यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर स्मारकावरील खर्चाची जबाबदारी जिल्हाधिकारी, सांगली यांची राहील. त्यांनी स्मारकाच्या कामाची प्रगती तसेच उपयोगिता संबंधिची माहिती, उपयोगिता प्रमाणपत्रास वेळोवेळी शासनास सादर करावी व महालेखापालांच्या लेख्याशी खर्चमेळाबाबतची कार्यवाही करावी. तसेच शासकीय स्मारक असल्याने प्रश्नांकीत जागा शासनाच्या नांवे करणे इ. पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर स्मारकाच्या बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्मारक समितीची राहील.

५. सदर खर्च हा लेखाशिर्ष-मागणी क्रमांक-एल-३, २५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम, १९६ जिल्हा परिषदांना / जिल्हास्तरीय पंचायतीना सहाय (००) (०६) थोर व्यक्तींची स्मारके उभरण्याकरिता अनुदान (२५१५२४८६), ३१ सहायक अनुदान (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ भाग पहिला उपविभाग तीन, अनुक्रमांक-४ नियम-२७ (२) अन्वये, अनावर्ती खर्चाच्या बाबतीत रुपये पाच कोटी पर्यंतच्य प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकारी प्रशासकीय विभागास आहेत. यानुसार हे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५२५/१६/इमा-३, दिनांक ३०.११.२०१६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201909192153578520 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANOJ DATTATARY JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATARY JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, postalCode=400001, street=BHANDHKAM BHAVAN,25 MARZBAN PATH,FORT,MUMBAI, serialNumber=2766afda86350272237dcf9a191545970f7f12e66d0605c664ca2bf0f3001dc0, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANOJ DATTATARY JADHAV
Date: 2019.09.20 15:38:58 +05'30'

मनोज जाधव

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.पालक मंत्री, सांगली जिल्हा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
८) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
९) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे.
११) जिल्हाधिकारी, सांगली.
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
१३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली
१४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली.
१५) जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली.
१६) सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, सांगली.
१७) कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास विभाग.
२१) निवड नस्ती (यो-११). ग्राम विकास विभाग.